# 🌾 शेतकरी सेंद्रिय खत योजना

75% अनुदानावर सेंद्रिय खताचा पुरवठा योजना

## ● योजनेचे नांव

**शेतकऱ्यांना 75% अनुदानावर सेंद्रिय /गांडुळ / लेंडी (शेळी व मेंढी) खताचा पुरवठा करणे**

## ● योजनेचे उद्दिष्ट आणि लाभ

जमीनीची पोत सुधारते जमीनी जल क्षमता वाढते. पर्यायाने उत्पादनात वाढ होते. त्यामुळे उत्पादनात वाढ करुन शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ करणे.

### 🌱 जमिनीची सुपीकता

जमिनीची सुपीकता वाढते आणि माती अधिक उत्पादनक्षम बनते.

### 💧 पाण्याची धारणा

पाण्याची धारणा सुधारते आणि पिकाची वाढ चांगली होते.

### 🌍 पर्यावरण अनुकूल

सेंद्रिय खत पर्यावरणासाठी चांगली आहे कारण ती माती व वनस्पतीचे पोषण करते.

### 🚫 प्रदूषणमुक्त

रासायनिक खतांप्रमाणे प्रदूषण करत नाहीत.

## ● पात्रता निकष

- ✓ लाभार्थी अर्जासोबत शेत जमीनीचा सात बारा व गाव नमुना 8-अ जोडणे आवश्यक आहे.
- ✓ लाभार्थी शेतकऱ्यांकडे स्वतःची जमीन असावी.
- ✓ जिल्ह्यातील सर्व घटकातील व वर्गवारीतील शेतकरी पात्र राहील.
- ✓ लाभार्थी निवड कृषि समिती मार्फत करण्यात येईल.
- ✓ प्रती शेतकरी 50 बॅग चे कमाल मर्यादेत सेंद्रिय खताचे वाटप करावे.
- ✓ डीबीडी तत्वावर सेंद्रिय खत अनुदानाची रक्कम लाभार्थ्याच्या थेट खात्यात जमा केली जाईल.
- ✓ या योजनेत एकाच लाभार्थीला दुबार लाभ देता येईल.

## ● आवश्यक कागदपत्रे

- 📄 विहित नमुन्यातील अर्ज
- 🏠 रहिवासी प्रमाणपत्र
- 🌾 शेतीचा 7/12 उतारा व 8-अ
- 🗺️ नकाशा
- 🆔 आधार कार्ड
- 🏦 बँकेचे पासबुक
- 📱 मोबाईल नंबर

## ● अर्ज करण्याची प्रक्रिया

**ऑफलाईन अर्ज:** अर्जाचा विहित नमूना कृषि विभाग, पंचायत समिती (सर्व) यांच्याकडे उपलब्ध आहे.

**अर्ज पत्र मिळण्याचे ठिकाण:** कृषि विभाग, पंचायत समिती (सर्व)

## ● जबाबदार अधिकारी व संपर्क माहिती

### योजना समन्वयक (जि. प. चंद्रपूर)

**कृषि विकास अधिकारी**

**नांव:** विरेंद्र रजपूत

**मोबाईल:** 9404991239

**ई-मेल:** adozpchandrapur@gmail.com

### तालुका योजना अधिकारी

**नांव:** विस्तार अधिकारी (कृषि) (सा.)

**कार्यलयीन पत्ता:** पंचायत समिती सर्व

## ● विशेष टीप / सूचना

कोणत्याही तक्रारीसाठी संपर्क: **कृषि विकास अधिकारी, जि. प. चंद्रपूर**

© शासकीय योजना - चंद्रपूर जिल्हा परिषद